## नि.दि.मु.क्र. ४२/२०१३ मधील नि.क्र.२८ वरील आदेश :–

प्रस्तुतचा अर्ज वादीने कोर्ट कमीशनर यांना कमीशनर अहवाल सादर करणेबाबत आदेश होऊन तसे पत्र त्यांना पाठविण्याकरीता केलेला आहे.

०२) अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंकडील विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. आदेशात्मक मनाई हुकूमाकरीताचा प्रस्तुतचा दावा हा वादीने दावा मिळकतीवर प्रतिवादीतर्फे करण्यात आलेल्या कथीत अतिक्रमणाच्या अनुषंगाने दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकनकरीता असे दिसून येते की, प्रस्तुत कामी नि. क्र. १३ कडील वादीचा कोर्ट कमीशन नेमणुकी करीताचा अर्ज दि. २९.१०.२०१५ रोजी माझे विद्वान पुर्वाधिकारी यांच्या आदेशान्वये मंजुर होऊन कथीत अतिक्रमणाच्या अनुषंगाने कोर्ट कमीशन अहवाल मागविण्यात आला होता. तथापि, सदर आदेशाप्रमाणे अद्यापी कोर्ट कमीशनचे कामकाज पुर्ण होऊन त्याचा अहवाल सादर झालेला नाही. नि. क्र. २५ कडील पत्राद्वारे मा. उपअधीक्षक, भुमी अभिलेख, शिंदखेडा यांनी दावा मिळकत ज्या मिळकतीमध्ये स्थित आहे त्या सर्व्हे नं. १९/२अ या मिळकतीची मंजुर अभिन्यासाप्रमाणे मोजणी न झाल्याने दावा मिळकतीचे बाबत कोर्ट कमीशनचे कामकाज पुर्ण करुन अहवाल सादर करता येत नसलेबाबत या न्यायालयास कळविले आहे. मात्र, नि. क्र. २७/१ कडील पत्रान्वये मा. उपअधीक्षक, भुमी अभिलेख, शिंदखेडा यांनी मा. जिल्हाधिकारी सो., धुळे यांना सदर पत्राच्या अखेरीस 'तथापि मा. न्यायालयाचे न्यायदानास सोईचे व्हावे म्हणुन वादातीत भुखंडाचे प्रस्तावित अभिन्यासाप्रमाणेचे क्षेत्र व आताचे संबंधित भुखंडाचे जागेवरील प्रत्यक्ष क्षेत्र याबाबतची माहिती जरुर तर इकडील कार्यालयाकडुन सादर करता येईल तथापि सदर माहिती ही प्रस्तावित अभिन्यासाप्रमाणेची असेल, अंतिम अभिन्यासाप्रमाणे नसेल' असे कळविल्याचे दिसुन येते.

०३) वरील परिस्थितीचा एकंदर विचार करीता हे स्पष्ट होते की, दावा मिळकतीबाबत अंतिम मंजुर अभिन्यासाप्रमाणे नसले तरी न्यायदानाचे कामकाज सुलभ व्हावे याकरिता प्रस्तावित अभिन्यासाप्रमाणे मोजणी करता येणे शक्य आहे. तथापि, प्रस्तुतचा अर्ज

मंजुर होऊन कोर्ट कमीशनर यांना प्रस्तावित अभिन्यासाप्रमाणे कोर्ट कमीशनचे कामकाज नि. क्र. १३ वरील आदेशाप्रमाणे पुर्ण करणेबाबत निर्देश देणे न्यायाचे कारणास्तव उचित होणारे आहे. प्रस्तुतचा खटला १० वर्षांपेक्षा जास्त काळाकरिता प्रलंबित आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणारे नाही. उलटपक्षी, त्याकारणे पक्षकारांमधील वाद पुर्णतः व कायमचा निकाली निघणारा आहे. त्यामुळे विविध न्यायालयीन प्रकरणांची गुंतागुंत देखील टळणारी आहे. सबब, मी वरील चर्चित कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे :–

**<u>– आदेश –</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. कोर्ट कमीशनर यांनी प्रस्तावित अभिन्यासाप्रमाणे कोर्ट कमीशनचे कामकाज नि. क्र. १३ वरील आदेशाप्रमाणे पुर्ण करावे व यथोचित अहवाल हया न्यायालयाकडे लवकरात लवकर सादर करावा.

३. वरीलप्रमाणेचे पत्र कोर्ट कमीशनर यांना पाठविण्यात यावे.

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2024.06.12 17:47:57 +0530

स्थळ : दोंडाईचा,
दिनांक : १२/०६/२०२४

आदित्य घ. नाईक
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर),
दोंडाईचा

प्रमाणपत्र

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | जी. एस. अहिरे |
| न्यायालयाचे नांव | – | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग–१, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – | १२.०६.२०२४ |

स्वाक्षरित/–
लघुलेखक.